## नियमीत दिवाणी मुकदमा क्र. १३०/२०१३ मधील निशाणी क्र. ६६ वरील आदेश
## (दिनांक ११.१२.२०१७)

०१. सदरचा अर्ज हा वादीने प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ विरुध्द अबेटमेंटचा झालेला आदेश रद्द बातल होवून मिळणे बाबत दाखल केलेला आहे.

०२. वादीच्या म्हणण्या प्रमाणे प्रतिवादी क्र.३६अ. तानुबाई भाउ राउत ही दिनांक २८.७.२०१३ रोजी मयत झाली असून मयत वारस दाव्यात पुर्वीच सामील आहेत. प्रतिवादी क्र. ४२ सदाशिव गणपत भंडारे हे दिनांक १.६.१९९० रोजी मयत झाले असून मयतास ४२अ ते ४२क हे वारस आहेत. प्रतिवादी क्र. ४३ सोपान गणपत भंडारे हे दिनांक २५.११.१९९८ रोजी मयत असून मयतास ४३अ ते ४३ब हे वारस आहेत. प्रतिवादी क्र. ४८अ लक्ष्मण बाळू राउत हे दिनांक १३.४.२०१४ रोजी मयत झाले असताना मयतास ४८अ१ नाथा लक्ष्मण राउत असे वारस आहेत. सदरचे वारस अभिलेखावर आणणे न्यायाचे आहे. परंतू वादीस मयताचे मृत्यूचे दाखले व मयताची माहिती वेळेत मिळाली नसलेमुळे मुदतीत वारस अभिलेखावर आणणे राहून गेलेले आहे. सदरचे वारस अभिलेखावर आणणेस वादीने हेतूपुरस्सर अगर जाणुनबुजून विलंब केलेला नाही. न्यायाचे दृष्टीने दावा अबेटचा झालेला हुकूम रद्द होणे जरुरीचे झले आहे. अन्यथा वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादींचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द बातल करण्याची विनंती केली आहे.

०३. या अर्जास उजर घेत प्रतिवादींनी आपले सविस्तर म्हणणे निशाणी क्र. ६६ खाली मांडले. प्रतिवादींच्या म्हणण्या प्रमाणे वादीचा अर्ज खरा नाही. वादीने जाणीवपुर्वक मुदतीत वारस अभिलेखावर घेतले नाहीत. वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुदयास आणि निष्कर्षास अनुसरुन उत्तर मी निम्न प्रकारे देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| ०१. वादींनी मागणी केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द बातल होवून मिळणे आवश्यक आहे का ? | .....होय |
| ०२. कोणता आदेश ? | ....अंतिम ओदशाप्रमाणे |

## कारण मिमांसा

**मुद्दे क्रमांक १ व २ :**

०५. उभयंताच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात दाखल सर्व कागदपत्राचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ हे मरण पावले तेंव्हापासुन ९० दिवसांच्या आत मयताचे वारसांना फलकावर घेवून वादपत्रात समाविष्ट करणे आवश्यक असतांना वादींनी अर्ज दिनांक ०२.०२.२०१७ रोजी दाखल केले. प्रस्तूत दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला असल्यामुळे सदरच्या दाव्यातील सर्व वारसांना फलकावर आणणे आवश्यक आहे.

०६. एकंदरित न्यायाच्या समतोलाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ चे वारंसाना वादपत्रात समाविष्ट करणे सुलभ न्यायादानाच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतू याबाबत दुमत नाही की, वादीने प्रस्तुतचा अर्ज हा वेळेत करण्यासाठी योग्य ती काळजी घेतली नाही त्यामुळे प्रस्तूत दाव्याचे काम लांबणीवर पडले आहे. म्हणून वादीस आदेशीत करण्यात येते की त्यांनी प्रतिवादींना खर्च/कॉस्ट रु. ५००/– दयावे असे म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी

देण्यात येते. मुद्दा क्र. २ च्या उत्तरा दाखल खालील आदेश पारित करण्यात येते.

**आदेश**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश मागे घेण्यात येतो.

०३. वादीने प्रतिवादींना खर्च म्हणून रु ५००/- दयावेत.

०४. वरील आदेशा प्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येतो.

**(रोहिणी रा. संकपाळ)**
दिनांक ११.१२.२०१७ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सांगोला

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Smt. R. R. Sankpal, Civil Judge, J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 11.12.2017 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 11.12.2017 |